Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

# स्वामी विवेकानंदाचे शैक्षणिक विचारांचा अभ्यास

संशोधक विद्यार्थी
**रणखांब श्रीनिवास सुरेश**

मार्गदर्शक
**डॉ. चव्हाण दादाराव रामजी**

**प्रास्ताविक :**

स्वामी विवेकानंद हे भारताला मिळालेला अमूल्य हिरा आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण स्वामी विवेकानंदांनी आपल्या अलौकिक व्यक्तित्त्वाने तसेच मधूर वाणीने सगळ्यांना प्रभावित करून हिंदू धर्मातील महान व शाश्वत महती पटवून दिली. तसेच जगाला भारतीय तत्त्वज्ञानाचा परिचय करून देण्याचे सर्व श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते. स्वामी विवेकानंदांच्या शिक्षण विषयक तत्त्वज्ञानाचा विचार केला असता त्यांचे शिक्षण विषयक तत्त्वज्ञान हे त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे.

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

जीवनविषयक विचाराप्रमाणेच स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचारही प्रभावी आहेत. भारताचा विकास तसेच भरभराट व उत्कर्षाकडे नेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण होय. शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले पाहिजे, राष्ट्र उभारणीचा तसेच राष्ट्रनिर्मितीचा शिक्षण हाच एकमेव पाया आहे. ज्यावेळी भारतीय समाज पारतंत्र्यात होता त्यावेळी भारतीय शिक्षण पद्धतीच्या मुलभूत दोषांवर विचार करत असलेल्या विचारवंतांमध्ये स्वामी विवेकानंदांचे नाव अग्रस्थानी होते. भारतातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे अशी त्यांची धारणा होती. शिक्षण म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून शिक्षण हे निसर्गात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तित्त्वात आहे. परंतु आपल्याला बहूतांशी त्याचे ज्ञान झालेले नाही.

**स्वामी विवेकानंदांच्या मते शिक्षणाचा अर्थ :**

स्वामी विवेकानंद यांचे शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास केला असता त्यांचे शिक्षण विषयक विचारांचा अभ्यास केला असता त्यांचे शिक्षण विषयक विचार खूपच व्यापक असून त्यात त्यांनी व्यावहारिकतेची जोड दिलेली आहे. ज्ञानाबद्दल त्यांनी पुढीलप्रमाणे कल्पना मांडली आहे. कोणतेही ज्ञान असो हे व्यक्तित बाहेरून टाकता येत नाही तर ते व्यक्तिच्या आतच असते. परंतु त्या ज्ञानावर अज्ञानाचे आवरण पडलेले असते. जर हे आवरण हटवले गेले तर व्यक्तीस सर्व प्रकारचे भौतिक व अध्यात्मिक ज्ञान प्राप्त होऊ शकते.

प्रत्येक व्यक्तीला जर योग्य संधी मिळाली, योग्य वातावरण उपलब्ध झाले तर व्यक्तीचे शिक्षण आपोआपच होते म्हणून तर बालकाला योग्य संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षणाचे कार्य होय.

**स्वयंअध्ययन हेच शिक्षण :**

स्वामी विवेकानंदांच्या मते कोणताही व्यक्ती कोणत्याही व्यक्तीला शिकवू शकत नाही. जसे रोपाला वाढवितांना जनावरांनी ते खाऊ नये म्हणून त्यांच्याभोवती कुंपण घालावे लागते, त्याची निगरानी करावी लागती. त्याचप्रमाणे बालकाच्या विकासासाठी योग्य परिस्थिती, संधी निर्माण करून देणे एवढेच शिक्षकाने करावे.

स्वामी विवेकानंदांनी तत्कालिक इंग्रजी शिक्षण पद्धतीवर जे इंग्रज भारतामध्ये राबवित होते त्यावर जोरदार टीका केली ते म्हणतात की, इंग्रजाच्या शिक्षण पद्धतीने फक्त बाबू लोकांची निर्मिती केले जाते. केवळ यंत्रवत काम करणारे मशीन तेही ठीक. ह्या शिक्षणाने केवळ बाह्य स्वरूपाने स्वामी विवेकानंदांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास केल्यास आपल्या असे लक्षात येते की, एकंदरीत आत्मविद्या आणि इहविद्या यांची फारकत न घेता त्यांचा समतोलपणे समन्वय साधावा अशी समावेशक योजनेचा स्वीकार करून त्यांनी भारतीय शिक्षण विचारात व कार्यात नव्या समन्वयवादाचा प्रवाह प्रबळ केला.

आजचा विद्यार्थी शिक्षणाद्वारे योग्य संस्काराद्वारे तेजस्वीपणे घडला तर उद्याचा भारत कर्तव्यदक्ष आणि बलवान बनायला वेळ लागणार नाही आणि भारतीय शिक्षण पद्धतीचे आनंददायी शिक्षण असावे असे जे ध्येय आहे ते साकार झाल्याशिवाय राहणार नाही.

स्वामी विवेकानंदांच्या मते, शिक्षणाने प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणामध्ये लोककल्याणाची भावना जागविली पाहिजे ही भावना व्यक्तीच्या अंतःकरणात एकवेळ जागली की, प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सेवेचे महत्त्व कळते आणि त्यातूनच मग सेवावृत्त कार्यकर्ते तयार होण्यास वेळ लागणार नाही. स्वाती विवेकानंद उपेक्षित व पद्दलित वर्गाच्या शिक्षणाविषयी त्यांना फार कळवळा होता. जर आपल्या राष्ट्राचा विकास करावयाचा असेल तसेच जर आपले राष्ट्र घडवायचे असेल तसेच जर आपला विकास व्हायचा असेल तर जनसामान्यांना शिक्षण दिलेच पाहिजे असे त्यांची स्पष्ट मत होते. जनसामान्य म्हणजेच पद्दलित वर्ग तसेच शिक्षणापासून हजारोवर्षे वंचित राहिलेल्या स्त्रिया होय असा विवेकानंदांना अर्थ अभिप्रेत होता.

स्वामी विवेकानंदांच्या मते, समाजातील अत्यंत खालच्या स्तरातील व्यक्तीपर्यंत जेव्हा शिक्षण पोहचेल तेव्हाच खरोखर राष्ट्राच्या विकासास सुरुवात होईल अन्यथा विकासासाठी कितीही प्रयत्न केले तर ते व्यर्थ ठरतील. म्हणून राष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर शिक्षणाची मुख्य भूमिका आहे. स्वामी विवेकानंदांना तर असे वाटते की, जनसामान्यांच्या शिक्षणाची उपेक्षा करणे म्हणजेच त्यांना राष्ट्रीय पाप केल्यासारखे वाटते आणि त्याचाच परिणाम म्हणजे आपला देश रसातळाला पोहचलेला आपल्याला दिसून येतो.

स्वामी विवेकानंदांच्या मते, पाश्चिमात्य राष्ट्र व पौर्वात्य राष्ट्रे यांच्यात मुलतः हा भेद आहे की, पाश्चातांची राष्ट्रे ही खऱ्या अर्थाने राष्ट्र आहेत. आमची तशी नाहीत कारण पाश्चात्य देशात शिक्षण आणि सभ्यता ही थोड्या लोकांपुरतीच मर्यादीत असून त्यांचा सर्वसाधारण जनतेत प्रवेश झाला आहे. गरीब लोक शिक्षण जवळ पोहचत नसतील तर शिक्षणाने त्यांच्यापर्यंत पोहचायला हवे.

स्वामी विवेकानंदांच्या मते खरे शिक्षण म्हणजे केवळ शब्द घोकणे नव्हे तर सर्व मानसिक शक्तीचा विकास करणे होय किंवा शिक्षण म्हणजे व्यक्तिला योग्य रितीने वळन लावणे होय. म्हणून शिक्षणाचा खरा अर्थ आपण समजावून घेतला पाहिजे. ज्या शिक्षणाच्या माध्यमातून इच्छाशक्तीचा प्रवाह आणि अभिव्यक्ती ही आपल्या स्वतःच्या ताब्यात येतात आणि फलद्रूप होतात त्यालाच खरे शिक्षण म्हणावे.

स्वामी विवेकानंदांना प्राचीन शिक्षण पद्धती बद्दल फार आस्था होती. त्यामुळे त्यांनी आधुनिक काळात देखील शिक्षण हे मुल्याधिष्ठीत शिक्षणावरच भर दिला आहे. पूर्वीच्या काळी अर्थाजनाचा हेतू न ठेवता मुलांना शिक्षण अत्यंत तन्मयतेने शिकवित असत परंतु कालांतराने त्यामध्ये बदल होऊन व आज वेतनावर आधारित ज्ञान प्रतिष्ठेचे ठरत आहे. याबद्दल स्वामी विवेकानंदांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. खरे शिक्षण हे मुलगामी असावे. मनुष्य घडविणारे शिक्षण असावे. विज्ञानाचा प्रभाव समाजाच्या प्रत्येक घटकात रुजल्याशिवाय तांत्रिक शिक्षणाच्या विकासाशिवाय नवा भारत घडणार नाही. म्हणून विवेकानंदांनी या देशाच्या सर्वांगिण विकासाला पूरक अशी शैक्षणिक तत्त्वांची जोपासणा केली. त्याचबरोबर प्रचलित शिक्षणाच्या ध्येयामध्ये असलेला आणखी एक दोष पुढील शब्दात स्वामी विवेकानंदांनी अचूकपणे सांगितला आहे. आपल्या आधुनिक शिक्षण पद्धतीत ज्या इंद्रियाच्या साह्याने म्हणजे मनाच्या साह्याने आपण ज्ञान प्राप्त करतो. त्याचा विकास व्हावा यासाठी पुरेशी काळजी व प्रयत्न केले जात नाहीत. तर एखाद्या स्पंजाने पाणी शोषून घ्यावे त्या प्रकारे मनाचा ज्ञान शोषून घेण्याकरीता उपयोग केला जातो. स्वामी विवेकानंदांना आधुनिक शिक्षण पद्धतीत हा दोष बोचत राहिला आहे. मनाचा विकास करणारे ज्ञान आपल्याला मिळाले पाहिजे असे त्यांना वाटत असे. चांगले, दर्जेदार व स्वतंत्र अस्तित्त्व मिळवून देणारे शिक्षण भारतीय तरूणांना मिळाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

**सारांश :**

स्वामी विवेकानंदांनी शिक्षणाला व्यवहारिकतेचे जोड असायला हवी अशी त्यांची धारणा होती. तसेच शिक्षण हे समाजातील की तळागाळातील सर्व सामान्य वंचित असे घटक होते त्यांना शिक्षण मिळाले पाहिजे जर त्यांना शिक्षण मिळाले तरच राष्ट्राचा विकास होईल.

स्वामी विवेकानंदांनी ब्रिटीशांच्या शिक्षण पद्धतीवर कडाडून टिका केली त्यांच्या मते त्यांच्या शिक्षण पद्धतीने केवळ बाबू तयार होतात. शिक्षणाने प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणामध्ये लोककल्याणाची भावना जागविली पाहिजे, शिक्षणामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास झाला पाहिजे. अशा प्रकारचे शिक्षणविषयक विचार स्वामी विवेकानंदांनी मांडले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

१. कुलकर्णी, शा. (२०१६), भारतीय व पाश्चात्य शिक्षण तज्ञ, नित्यनुतन प्रकाशन.
२. नंदनवार, आ., शिक्षणशास्त्रज्ञ आणि विचारवंत.
३. शोधनिबंध संग्रह, (२०१३), युगनायक स्वामी विवेकानंद, लातूर : विद्याभारती प्रकाशन.
४. घोडमोडे, के. यु., घोडमोडे, क. (२०१२), शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, नागपूर : विद्या प्रकाशन.
५. अभ्यंकर, शं. वा. (२००३), युगाचार्य स्वामी विवेकानंद, पूणे : आदीत्य प्रतिष्ठाण.